महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी. कला महाविदयालय, डॉ.दा.नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१, दुरध्वनी क्रमांक २२६२०२३१/३२

E mail address : controllerofexamination.doa@gmail.com

पत्र क्रमांक :-शारेप-२०१९/चार/ 1120 दिनांक 26 JUL 2019

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,

तथा

केंद्र प्रमुख,शासकीय रेखाकला परीक्षा.

विषय- शासकीय रेखाकला परीक्षा
आवेदनपत्रक सादर करण्याबाबत.

संदर्भ- परिपत्रक क्रमांक-डिओअे/२०१९/IV/९४३ दिनांक-०१/०७/२०१९

महोदय/महोदया,

वरिल विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय परिपत्रक कृपया पहावे.

सदर परिपत्रकानुसार सहभागी शाळांनी आवेदन पत्रक केंद्राकडे सादर करण्याचा दिनांक २७ जुलै २०१९ व केंद्राने कला संचालनालयाकडे आवेदन पत्रक (व्दिप्रतीत) सी.डी व परीक्षा फी सह सादर करण्याचा दिनांक ०७ ऑगस्ट २०१९ कळविण्यात आला होता.

सदर परिक्षेस विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग व काही केंद्राकडील अपुरी बैठक व्यवस्था यामुळे नवीन केंद्र मंजुरी तसेच विद्यार्थी, सहभागी शाळा व केंद्राकडील अडचणी विचारात घेऊन ज्या शाळा/केंद्राना वरील वेळापत्रकानुसार आवेदनपत्रक सादर करण्यास अडचण निर्माण होत आहे. अशा सहभागी शाळा/केंद्राकरिता खालीलप्रमाणे आवेदन पत्रक सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सहभागी शाळांनी आवेदन पत्रक केंद्राकडे पाठविण्याचा दिनांक:- ०५ ऑगस्ट २०१९ | केंद्रप्रमुखानी कला संचालनालयाकडे एकत्रित आवेदन पत्रक सादर करण्याचा दिनांक:-१३ ऑगस्ट २०१९ |

ज्या केंद्राकडे बैठक व्यवस्थेनुसार नाव नोंद पूर्ण झाले असेल त्यांनी आवेदन पत्रक संदर्भीय दिनांक ०१.०७.२०१९ च्या पत्रानुसार संचालनालयाकडे सादर करावी.

काही केंद्रांनी केंद्र बंद करत असल्याचे पत्र संचालनालयाकडे पाठवून त्यांना प्राप्त झालेल्या लेखनसामग्रीबाबत काय करावे, याबाबत विचारणा होते आहे. संबंधीत शाळांनी केंद्र बंद करण्याबाबतचा प्रस्ताव मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या मार्फत सादर करणे अपेक्षित असून सदर केंद्रावर बसणा-या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून संबंधीतांना केंद्राच्या केंद्रप्रमुखांनी नजीकच्या शाळेत नवीन केंद्र मंजुर होईपर्यंत सध्याचे केंद्र परस्पर बंद करता येणार नाही. त्यामुळे २०१९ ची परीक्षा मंजुर केंद्रावरच घ्यावी. अपरिहार्य परिस्थितीत केंद्र बंद करण्या-या शाळेचे केंद्रप्रमुख व नवीन केंद्र घेणा-या शाळेच्या केंद्रप्रमुखांनी मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याशी संपर्क साधून केंद्र बंद करणे/नवीन केंद्र मंजुरीबाबतची शिफारस पत्र इत्यादी करिता समन्वयाने कार्यवाही पूर्ण करावी. जेणेकरुन परिसरातील शाळेतील जे विद्यार्थी शासकीय रेखाकला परीक्षेस बसण्यास इच्छुक असतील त्यांना नवीन केंद्रावर परिक्षेस बसता येईल.

(नागेश वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत. माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१) संचालक,शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

२) सर्व शिक्षण उपसंचालक,मुंबई,पुणे,नाशिक,कोल्हापुर,औरंगाबाद,अमरावती,नागपूर,लातुर.

३) शिक्षण निरीक्षक,उत्तर/दक्षिण/पश्चिम, मुंबई.

४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),सर्व जिल्हा परिषदे.

५) निवड नस्ती.